X49DAE

F.Y.B.A marath L-II

[वेळ : तीन तास] [गुण : १००]

Please check whether you have got the right question paper.

सूचना : 1. सर्व प्रश्न सोडवणे आवश्यक आहे.
2. उजवीकडील अंक गुण दर्शवितात.

प्र. १ अ) 'काव्यबंध' या काव्यसंग्रहातील दलित कवितांमधून आत्मभान कसे प्रकटले आहे ते सोदाहरण स्पष्ट करा. २०

किंवा

ब) 'काव्यबंध' या काव्यसंग्रहामधून व्यक्त झालेल्या मार्क्सवादी जाणिवेचे स्वरूप स्पष्ट करा.

प्र. २ अ) 'काव्यबंध' या काव्यसंग्रहामधून स्त्रीजाणिवेचा आविष्कार कसा झाला आहे ते सोदाहरण लिहा. २०

किंवा

ब) 'काव्यबंध' या काव्यसंग्रहातील आदिवासी कवितांमधून व्यक्त झालेल्या आदिवासींच्या वेदनेचे चित्रण करा.

प्र. ३) पुढीलपैकी कोणत्याही दोन टीपा लिहा. १०
अ) 'नफिसा' कवितेचा आशय
ब) 'मेलं नाही अजून आभाळ' मधील आशावाद
क) 'आत्ता' मधील आशय
ड) 'इराणी' कवितेचा आशय

प्र. ४) अ) ठाण्यातील घनकचरा व्यवस्थापन प्रश्नासंबंधी नेमलेल्या समितीने ठाणे महानगरपालिका आयुक्तांना सादर करावयाचे अहवालात्मक इतिवृत्त तयार करा. १०

किंवा

आ) ठाणे जिल्हा सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त तयार करा.

प्र. ५) अ) शहरात नव्याने सुरु होणाऱ्या पंचतारांकित हॉटेलची वर्तमानपत्रासाठी जाहिरात तयार करा. १०

किंवा

आ) महिला बचत गटातर्फे शिवाजी मैदान येथे आयोजित गृह उपयोगी वस्तूंच्या प्रदर्शनाची वर्तमानपत्रासाठी जाहिरात तयार करा.

प्र. ६) पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. १०

श्रीज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाजवळ जी मागणी केली ती स्वत:साठी तर नाहीच, पण अखिल विश्वातील प्राणिमात्रांसाठी! यातही विशेष हे की, आपले शत्रू किंवा दुर्जन नष्ट व्हावेत अशीही ती मागणी नव्हती. दुष्टांचे दुष्टत्व सरो, एवढीच त्यांची इच्छा. दुष्ट माणसातील दुष्टत्व काढून घेतले म्हणजे उरतो निखळ माणूस – शुद्ध, निर्मळ व संस्कारक्षम. समाजातून गुन्हे नष्ट व्हावेत, गुन्हेगार नव्हेत, अशी वांच्छा मनी धरणे हे उच्च संस्कृतीचे लक्षण नव्हे काय? इंग्रज राज्यकर्त्यांचा द्वेष करू नका, इंग्रजी राज्यपद्धतीला विरोध करा, या महात्मा गांधींच्या उपदेशाचे रहस्य हेच आहे. याबाबतीत कालाच्या प्रगतीत असो किंवा विचाराच्या सूक्ष्मतेमुळे असो–ज्ञानेश्वरीने गीतामाउलीच्या पुढे मजल मारली आहे. 'विनाशाय च दुष्कृताम्' म्हणजे दुष्कृत्ये करणाऱ्या माणसाचा नाश करण्यासाठी मी युगायुगांच्या ठायी अवतार घेतो, असे भगवान श्रीकृष्ण गीतेत

XY9DAE

सांगतात; तर श्रीज्ञानेश्वर महाराज वांच्छितात, 'खळांची व्यंकटी सांडो', खलांचे खलत्व जावो. खलच नामशेष होवोत, अशी त्यांची वांच्छा नाही. मानवी मनाच्या मुलभूत सद्भावावर त्यांचा अढळ विश्वास होता आणि म्हणून दुर्जनांच्या हृदयपरिवर्तनावरही.

प्र. १) ज्ञानेश्वरीने गीतामाउलीच्या पुढे मजल कशी मारली आहे?
२) ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाजवळ कोणती मागणी केली?
३) उच्च संस्कृतीचे लक्षण कोणते?
४) ज्ञानेश्वरांचा कोणत्या गोष्टीवर अढळ विश्वास होता?
५) महात्मा गांधींनी कोणता उपदेश केला आहे?

किंवा

आ) पुढील उतारा वाचून त्याखाली विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

साने गुरुजींनी गोष्टी तर सांगितल्याच; पण भारतीय संस्कृती सांगितली तीही गोष्टीरुपानेच. चरित्रे सांगितली तीही गोष्टीरुपानेच. कला म्हणजे काय सांगितले, तेही गोष्टीरुपानेच. पत्रांच्याही गोष्टी केल्या, विचारांच्याही गोष्टी केल्या, कवितांच्याही गोष्टी केल्या. 'सोन्या मारुती' निबंधात आहे, तेच 'श्यामची आई' या स्मृतिकथांत आहे असे गुरुजींनी म्हटले आहे. गुरुजींची कथा म्हणजेच 'गोड निबंध' व 'प्रबंध' म्हणजेही कथाच! गोष्ट हे केवळ साहित्य नसते, तर एक सहवास असतो. गोष्ट सांगणारा व ऐकणारा यांचे एक आत्मीयतेचे नाते असते. गोष्टीच्या या अध्यात्माचा एक जन्मजात जाणकार म्हणजे गुरुजी. गोष्टीच्या अध्यात्माचे यथार्थ ज्ञान घेऊनच गुरुजी जन्मास आले. त्यांचा पक्ष हा सामान्य माणसाचा, बाळगोपाळांचा, उमलत्या-फुलत्या युवकांचा, कष्टाळू शेतकरी-कामगारांचा! गुरुजींना त्यांच्यासाठी गोष्टी सांगावयाच्या होत्या. जिव्हाळ्याने, प्रेमाने; त्यांना सुंदर, समर्थ संस्कारसंपन्न करण्यासाठी!

प्र. १) साने गुरुजींनी कोणता साहित्यप्रकार आवडीने हाताळला?
२) गोष्ट सांगणारा व ऐकणारा यांचे नाते कोणत्या प्रकारचे असते?
३) साने गुरुजींनी कोणता हेतू ठेवून गोष्टी सांगितल्या?
४) साने गुरुजींनी कोणासाठी गोष्टी सांगितल्या?
५) साने गुरुजींनी गोष्टीरुपाने काय काय सांगितले आहे?

प्र. ७ पुढीलपैकी कोणत्याही एका उताऱ्याचे सारांशलेखन करा. १०

मनाला केवळ आनंद देणे किंवा मनाचे निव्वळ रंजन करणे हाच कलेचा हेतू आहे, असे म्हणणाऱ्या अडाणी माणसांची कीव करावीशी वाटते. त्यांना निसर्गाच्या उत्क्रांतिमय जीवनाचे रहस्य मुळीच कळलेले नाही, असे म्हणावयाला पाहिजे. सुंदर चित्र पाहिल्याने, मधुर गायन ऐकल्याने किंवा उत्कृष्ट मूर्ती पाहिल्याने आपल्याला आनंद तर होतोच होतो. पण त्यामुळे आपली जीवनशक्ती अधिक समृध्द होते. भावनांचा विकास होतो आणि बुद्धीची उत्क्रांती होते. कलेच्या उपभोगाने आपण अधिक सुखी, अधिक तृप्त आणि अधिक उन्नत होतो. म्हणून निसर्गाच्या उत्क्रांतीचे अपरिहार्य कार्य चालू ठेवणे, हेच कलावंताच्या आयुष्याचे ध्येय आहे. म्हणूनच समाजाच्या आनंदासाठी, प्रगतीसाठी आणि उध्दारासाठी कलेची आणि कलावंतांची जरुरी आहे. कलावंतांच्या पावलांनी समाज चालत असतो, कलावंतांच्या डोळ्यांनी समाज पाहत असतो आणि कलावंतांच्या बुध्दीने समाज विचार करीत असतो. हजारो वर्षांच्या काळात मानवजातीने प्रगतीचा आणि संस्कृतीचा जो टप्पा आज गाठलेला आहे, त्याच्या श्रेयाचा मोठा वाटा कलावंतांनाच द्यावयाला पाहिजे. कलावंतांची कला ही समाजासाठी आहे; आणि कलावंतांवाचून समाज हा सर्वस्वी असहाय्य आहे.

किंवा

XY9DAE

भारतीय संस्कृतीत अंधश्रद्धेला स्थान नाही. विचारांचा महिमा सर्वत्र गायलेला दिसून येईल. भारतीय संस्कृतीचा वेद हा पाया मानला आहे. परंतु वेद म्हणजे काय? वेद या शब्दाचा ज्ञान असा अर्थ आहे. ज्ञान हा भारतीय संस्कृतीचा आधार आहे. ज्ञानावर उभारलेली ही भव्य संस्कृती आहे. वेद किती आहेत? वेद अनंत आहेत. ऋगवेद, यजुर्वेद, सामवेद, अथर्ववेद एवढेच वेद नाहीत. भारतीय संस्कृतीचा एकच ऋषी नाही. एकच पैगंबर नाही. भारतीय संस्कृती गगनाप्रमाणे विशाल व सागराप्रमाणे अथांग आहे. जीवनाला सुंदर करणारा प्रत्येक विचार म्हणजे वेद आहे. आपले आयुष्य आनंदी, उत्साही कसे राहील हे आयुर्वेद सांगेल. समाजाचे रक्षण कसे करावे ते धनुर्वेद सांगेल. समाजाची करमणूक कशी करावी, समाजाला दु:खाचा विसर कसा पाडावा हे गांधर्व वेद सांगेल. हे सारे वेदच आहेत. काळ अनंत आहे व ज्ञानही अनंत आहे. नवीन नवीन ज्ञान उदयास येईल व भारतीय संस्कृती सर्वांआधी त्या ज्ञानाचा सत्कार करावयास उभी राहील.

प्र. ८ पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. १०

१) महागाईचा भस्मासुर
२) माझा आवडता चित्रपट
३) किल्ल्याचे मनोगत
४) मी पंतप्रधान झालो तर...

----------